# भूमिगत मेट्रोच्या बोगद्यांचे काम पूर्ण



म. टा. प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ प्रकल्पाने वेग घेतला असून, एमएमआरसीने सलग दोन दिवसांत दोन बोगद्यांचे खोदकाम यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

मंगळवारी, मध्यरात्री १ वाजता, कृष्णा ३ या टीबीएम मशीनने पॅकिज ४मधील सिद्धिविनायक मंदिर ते वरळी स्थानक हे १.२८ किमी अंतर खोदून पूर्ण केले. यासाठी ९१६ सेगमेंट रिंग्जचा वापर करण्यात आला. तर, बुधवारी दुपारच्या सुमारास गोदावरी ३ या टीबीएम मशीनने बहुचर्चित असा मिठी नदीखालील पहिला बोगदा २८७ दिवसांत खोदून पूर्ण केला. हे दीड किमी अंतर खोदण्यासाठी १०७२ सेगमेंट रिंग्जचा वापर करण्यात आला. काहीच दिवसांत मिठी नदीखालील दुसरा बोगदाही खोदून पूर्ण करण्यात येणार असल्याचे एमएमआरसीएलच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.